# परीक्षांचे मुलांवरील ताण जरा सैल करूया

शिक्षणात बरेच बदल घडताहेत हे खरे आहे ! 'राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण' ( एन्. सी. इ. आर. टी ) संस्थेने १००७ साली, नवीन, राष्ट्रीय शिक्षणक्रम आराखडा' प्रसिद्ध केला. त्यात शिक्षणाची संपूर्ण पठडी बदलण्याबाबत अनेक सूचना केल्या आहेत. त्यात शाळांतील घट्ट, बंदिस्त, प्रश्नोत्तरी परीक्षा 'सैल' कराव्यात; परिक्षांचा संबध केवळ क्रमिक पुस्तकांमधील धड्यांवरच्या प्रश्नांशी असू नये तर तो मुलांच्या वर्गातील विविध अनुभवांच्या जीवनाशी जोडावा अशी एक महत्त्वपूर्ण सूचना केली होती.

वास्तविक या आराखड्यापूर्वीच म्हणजे २००४ सालीच महाराष्ट्र सरकारने एक पत्रक काढून शाळांना कळविले होते की त्यांनी शालेय परिक्षांचे रूप अधिक कल्पकतेने बदलावे. परंतु शाळा-संस्थांना नि त्याच्या मुख्याध्यापकांना त्याचा आशय कळला तरी नाही किंवा मानवला तरी नाही. त्यामुळे शाळाशाळांमधील परीक्षा या शिक्षकांना सोप्या व विद्यार्थी व पालकांना ताणपूर्ण अशाच राहिल्या.

गेल्या वर्षी, महाराष्ट्र शिक्षण खात्याचे एक पत्रक १७ मार्च २०१० रोजी प्रसिद्ध झाले आहे. त्यात, प्राथमिक शाळांमध्ये मागील शासनातील मंत्र्यांनी, आपल्या परीक्षांवरील प्रेमाच्या हट्टापोटी सर्व शाळांवर लादलेल्या चार चाचणी परीक्षांबाबतची एक छोटीशी सुधारणा सुचविली आहे. ती म्हणजे, या चाचण्या आजवर होत होत्या तशा 'लेखी स्वरूपातच असण्याची गरज नाही. तोंडी वा प्रकल्पातील सहभागातून वा अन्य कल्पक पद्धतींनी घ्यावयास हरकत नाही. अल्पप्रमाणात का होईना, परंतु शाळांमधील बंदिस्त परीक्षा पद्धती सैल होत आहे, यामुळे ही सूचना स्वागतार्ह आहे.

वास्तविक हा निर्णय, शालेय शिक्षणातील सर्वच परीक्षांना लावायला हवा. परंतु सरकार धाडस करते ते सुद्धा मंदगतीने. एकूणच परीक्षा ही विद्यार्थ्यांसाठी ताणपूर्ण गोष्ट आहे. त्यातही विशिष्ट वेळेच्या बंधनात घेतलेली लेखी परीक्षा ही तर अधिकच ताणपूर्ण असते. शिवाय परीक्षेचे स्वरूप जर क्रमिक पुस्तकातील धड्यांवरची ठराविक उत्तरे असलेली, वस्तुनिष्ठ प्रकारची प्रश्नमालिका असे असेल व त्याचे यश घोकमपट्टीच्या स्मृतीवर आधारलेले असेल तर मग परीक्षा ही केवळ ताणपूर्णच नव्हे तर ती जीवनाला सामोरे जाण्याऐवजी, जीवनाकडे पाठ फिरविणारी अशीच ठरते.

परीक्षा 'सेल' करणे याचा, केंद्रसरकारच्या १००७ सालच्या अभ्यासक्रमात मांडलेला अर्थ आहे तो, परीक्षांची क्रमिक पुस्तकांच्या तावडीतून सुटका करून, त्यांचा संबंध विद्यार्थ्यांच्या जीवनानुभवाशी जोडणे असा आहे. अशा अनुभवांना जर वर्गजीवनात स्थान असेल, तरच त्याची सांगड सरकारी सूचनेची कदर राखणारी अशी असू शकणार आहे. अन्यथा, शिक्षकलोक त्याचा सोयिस्कर अर्थ काढून विद्यार्थ्यांना केवळ गुण देण्याचे कर्तव्य पार पाडतील, हा धोका आहेच! परीक्षांचे ताण सैल करणे याचा अर्थ,

१. परीक्षांची संख्या अत्यंत मर्यादित ठेवणे.

वर्षभरात आजच्या सारख्या चाचण्या-परीक्षा खूप असतील तर शाळेतील सारेच शिकणे-शिकविणे परीक्षाकेंद्री बनते. परीक्षेसाठी अभ्यास असेच सूत्र नकळतपणे परीक्षेचा संबंध भीतीशी जोडला जातो. अभ्यास हा विषय आकलनासाठी असतो, ही शैक्षणिक घटनाच व्यवहारात गळून पडते.

१. परीक्षांचा क्रमिक पुस्तकांशी असलेला संबंध तोडणे.

क्रमिकपुस्तकांचे शिक्षणातील स्थान हे केवळ दिशादर्शक असते. या दिशेने जाता येईल तितके पुढे शिक्षक व विद्यार्थी यांनी परस्परांसोबत जायचे असते. क्रमिक पुस्तकातील धडे हे अभ्यासक्षेत्र दर्शविणारे प्रातिनिधिक तुकडे असतात. ते आधाराला घेऊन, विषयात अधिक दूर, अधिक खोल, अधिक उंच असे जायचे असते. परंतु शिक्षक सोयिस्करपणे केवळ क्रमिक पुस्तकातील धडे हेच अंतिम 'ज्ञान' मानून विद्यार्थ्यांना, धड्यांवरील प्रश्नोत्तरातच अडकवून ठेवतात. याचा परिणाम असा होतो की, शिक्षण इतके संकुचित होते की ते बहुधा निरूपयोगी ठरते; आणि याचा आपल्या जीवनाशी काय संबंध आहे हे न सापडल्याने, परीक्षा व अभ्यास या गोष्टी ताणपूर्ण बनतात.

३. परीक्षेचे स्वरूप. परीक्षेचे स्वरूप वस्तुनिष्ठ प्रश्नांचे न ठेवता, त्यात विद्यार्थ्यांच्या स्वयंप्रकृतीला व्यक्त होण्याची संधी ठेवणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास' एवढेच मर्यादित उद्दिष्ट जरी शालेय शिक्षणाने ठेवले तरी, त्याचे व्यक्तिगत पातळीवर अनेक पैलू असतात. उदाहरणार्थ, तार्किक विचार करता येणे, कल्पनाशक्तीला धुमारे फुटणे, भाषिक अभिव्यक्ती प्रभावीपणे साधणे, हे आणि असे अनेक. वर्गशिक्षणात या पैलूंच्या विकासाचे उपक्रम यावेत आणि परीक्षांनी अशा विविध पैलूंचे मोजमाप करायचा प्रयत्न करायला हवा. वस्तुनिष्ठ प्रश्नोत्तरी स्वरूप बदलून व्यक्तिनिष्ठ विकासक असे स्वरूप परीक्षेला द्यायला हवे.

४. प्रत्यक्ष वर्गातील शिक्षणव्यवहार. परीक्षांबाबत असे बदल करायचे तर त्यासाठी वर्गातील शिक्षणव्यवहाराचेच स्वरूप बदलते. आणि हेच नेमके केंद्र शासनाला २००७ सालच्या अभ्यासक्रम आराखड्यात अपेक्षित आहे.

आता चाचण्यांच्या लिखित स्वरूपाला सुट्टी द्यायची आहे. मग नेमके काय करायचे ? 'लेखी नाही म्हणजे तोंडी' एवढाच पर्याय लगेच सर्वांच्याच डोळयांसमोर येतो. केवळ तोंडी परीक्षा जरी द्यायची झाली तरी तिचा आशय ठरविण्याचा प्रश्न उपस्थित होतो. आणि इथे नेमका क्रमिक पुस्तकाच्या वापराचा धोका निर्माण होतो. सामान्यतः शिक्षक जे प्रश्न लेखी परीक्षेत विचारायचे तेच थोड्याफार फरकाने विचारु न मुलांना तोंडी उत्तरे द्यायला लावतील. हेच नेमके करायचे नाही, हे शिक्षकांनी लक्षात ठेवले पाहिजे.

ज्यावर तोंडी प्रश्न विचारायचे तो आशय विद्यार्थ्यांच्या शालेय व शाळाबाह्य अनुभवांतून आलेला, आणि म्हणून बहुधा तो प्रत्येकाचा वेगवेगळा असा असणार आहे. आता कदाचित प्रश्नही सर्वांना समान विचारले जातील ( तसे करण्याची मुळीचच गरज नाही !) पण, प्रत्येकाची उत्तरे वेगवेगळी असतील, ती शिक्षकांना स्वीकारायला हवीत. ही उत्तरे विद्यार्थ्यांच्या सच्च्या अनुभवांतून येतील, व त्यावरून त्यांच्या बौद्धिक विकासाच्या पायरीची जाण आपल्याला येऊ शकते. मुलांचे बोलणेम्हणजेच भाषिक बोली अभिव्यक्ती- सुस्पष्ट आहे का, उच्चार योग्य आहेत का, विचारांत तार्किक सुसंगती आहे का, एखाद्या छोट्याशा कल्पनेचा विस्तार व्यवस्थित आहे का, बोलताना अडखळत नाही ना, आरोह-अवरोह योग्य वाटतात का, बोलतानाही अदृश्य विरामचिन्हांचा वापर

नेटकेपणाने होत आहे ना, अशा कितीतरी गोष्टींचे मूल्यमापन करता येईल, त्यांवर गुण देता येतील. मात्र सर्रास १० पैकी १८, १९ गुण देण्याचा मोह शिक्षकांनी टाळायला हवा.

अशातहेने विद्यार्थ्यांच्या मूल्यमापनाचे काहीसे निकष ठरविले तरीही मुख्य मुद्दा आहे तो आशय आकलनाचा. मुलांना विविध अनुभव मिळणे हा शिक्षणाचा पाया आहे. शहरी मुलांना खेड्यांतील उभ्या पिकांची सहल घडविली किंवा खेड्यांतील मुलांना शहरांतील प्रेक्षणीय स्थळे दाखवून तिथल्या गर्दीचा अनुभव दिला तर, ती मुले त्यांत मनापासून सहभागी झाली का, रमली का, काय वेगळे अनुभवले, व्यक्तिशः कुणाला काय भावले, कुणाला कोणते प्रश्न नव्याने पडले, कुणाला काय करावेसे वाटले, काय सांगावेसे वाटले, या आशयाचा शोध तोंडी वा मुक्त निबंध लेखनाची संधी देऊन घेता येईल. इथे, अनुभवकथनाबाबतचे एक वैशिष्ट्य लक्षात ठेवायला हवे. अनुभव तोच असला तरी प्रत्येकाची तो घेण्याची रीत वेगळी असते; कारण ती त्यांच्या पूर्वानुभवांशी जोडले जात असते. तसेच प्रत्येकाची अभिव्यक्ती वेगळी असते. ती अनुभवांच्या तीव्रतेशी, भाषिक क्षमतेशी आणि आवडी-निवडींशी

बद्ध असते. साहजिकच येथे विद्यार्थ्यांच्या परस्पर तुलनांना कुठेच स्थान नसते. गुण द्यावेत पण तुलनांचा मोह टाळावा. शैक्षणिक वातावरण स्वच्छ होऊ लागते.

अनुभवांद्वारे शिक्षण हेच चांगले शिक्षण असते. त्यामुळे शालेय वर्षाच्या सुरुवातीलाच इयत्तावार, छोटया अनुभवांकडून मोठ्या अनुभवांकडे, साध्या अनुभवांकडून गुंतागुंतीच्या, अधिक अमूर्त, अधिक तार्किकतेकडे नेणाऱ्या अशा, पुन्हा विविधांगी, अनुभवांचे नियोजन केले पाहिजे. आपल्याला केवळ परीक्षाच सैल करायच्या नाहीत तर शिक्षणरचनाच सैल करायची आहे. त्याकरता, क्रमिक पुस्तकांनी दर्शविलेल्या दिशेचे नि स्तराचे भान ठेवत पण, त्याबाहेर जाऊन प्रत्येक घटकाभोवतीच्या अनुभवांची मांडणी करायला शिक्षकांनी आपणहून शिकले पाहिजे. बाह्य जगातील जे अनुभव वर्गांमध्ये आणता येतील ते आवर्जून आणले पाहिजेत; जे अनुभव वर्गात आणता येत नाहीत, त्यांच्यासाठी विद्यार्थ्यांना घेऊन वर्गाबाहेर पडले पाहिजे.

यासाठी अर्थातच्, अमुक आठवड्यात, अमुक धडा पूर्ण झाला पाहिजे, अशी क्रमिक पुस्तकांधिष्ठित सूचनागिरी शासकीय अधिकाऱ्यांनी बंद केली पाहिजे. शिक्षकांना आशय शोधण्याचे, तो विद्यार्थ्यांपर्यंत पोचवण्याचे आणि त्यासाठी केवळ क्रमिक पुस्तकाबाहेरच नव्हे तर शाळांतील वर्गाबाहेर विद्यार्थ्यांना घेऊन पडण्याचे स्वातंत्र्य मुक्तपणे भोगता आले पाहिजे. अर्थात शिक्षकांनीही शिक्षणाच्या प्रभावीकरणासाठी शासकीय तरीही निरर्थक नियमांच्या बाहेर पडण्याचे धैर्य दाखवले पाहिजे. शासकीय परिपत्रकाची बूज राखण्याचा हाच एकमेव मार्ग आहे.

❖